पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

PUNE METROPOLIS

PUNE METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

# नागरिकांची सनद

देवेंद्र फडणवीस
मुख्य मंत्री
महाराष्ट्र

मंत्रालय
मुंबई-४०० ०३२

१५ जून २०१७

# शुभेच्छा

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे नागरिकांची सनद प्रकाशित करण्यात येत आहे, ही समाधानाची बाब आहे.

देशात सर्वाधिक वेगाने नागरिकरण होणाऱ्या राज्यात महाराष्ट्र अग्रेसर असून येत्या काही वर्षात राज्यातील ५० टक्क्यांहून अधिक लोकसंख्येचे नागरीकीकरण होईल. या वाढत्या शहरीकरणाचे सुव्यवस्थित नियोजन करण्यासह नागरिकांचे जीवनमान उंचाविण्यासाठी राज्य शासन विविध उपक्रम आणि अभियाने राबवित आहे.

पुणे परिसरातील नागरिकांच्या आकांक्षांना न्याय देण्यासाठी शासनाकडून पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे. या प्राधिकरणातर्फे प्रकाशित करण्यात येणाऱ्या नागरिकांच्या सनदेच्या माध्यमातून पारदर्शक, कार्यक्षम आणि तातडीने पुरविण्यात येणाऱ्या सेवांबाबत नागरिकांमध्ये जागृती निर्माण करणे शक्य होणार आहे, त्यामुळे हा उपक्रम प्रशंसनीय आहे. नागरिकांच्या समस्या सुलभरित्या सोडविण्यासाठी प्राधिकरण भविष्यातही तत्परतेने कार्यरत राहील, असा विश्वास वाटतो.

(देवेंद्र फडणवीस)

दूरध्वनी : ०२२-२२०२ ५१५१/२२०२ ५२२२, फॅक्स : ०२२-२२०२ ९२१४
ई-मेल : cm@maharashtra.gov.in, वेब साईट : www.maharashtra.gov.in

# ❋ प्रस्तावना ❋

अधिसुचना :

शासनाच्या नगर विकास विभागाकडील निर्णय क्र.टीपीएस-१८१५/१२०४/१३/प्र.क्र.८७/१५/नवि-१३, अन्वये प्रसिद्ध अधिसुचना दि.३१/०३/२०१५ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ४२ क चे उपकलम (१) व (२) नुसार "पुणे महानगर प्रदेश विकास क्षेत्र" घोषित करण्यात आले आहे व महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ४२ ग चे उपकलम (१) व (३) नुसार, पुणे महानगर प्रदेश क्षेत्राकरिता "क्षेत्र विकास प्राधिकरण" गठीत करण्यात आले. तसेच,नगर विकास विभागातील शासन निर्णय क्रमांक: टीपीएस-१८१५/१२०४/१३/प्र.क्र.८७/१५/शुद्धिपत्रक/नवि-१३ दि.०५/०८/२०१५ अन्वये निर्गमित केलेल्या शुद्धिपत्रकान्वये पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय-३२. यांचेकडील अधिसुचना ११ जुलै २०१६ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ आणि महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अध्यादेश,२०१६, ची अधिसुचना क्र.पीएमआरडीए, ३३१६/प्र.क्र.५४/नवि-७. नुसार पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची हद्दवाढ करणेत आलेली आहे.

महाराष्ट्र शासनाचे दि. ४ डिसेंबर २०१५ ची अधिसुचना क्र.टीपीएस.१८१५/६१३/प्र.क्र.३०९/१५/नवि-१३ अन्वये इतर बाबींसह पुणे महानगर विकास क्षेत्राची हद्द वाढवुन सुधारित हद्दवाढ घोषित केली आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने दि.१० फेब्रुवारी २०१६ ची अधिसुचना क्र. टीपीएस.१८१५/६१३/प्र.क्र.३१३/१५/नवि-१३, अन्वये इतर बाबींसह पुणे महानगर विकास क्षेत्राची आणखी हद्द वाढवून सुधारित हद्दवाढ घोषित केली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी महाराष्ट्र महानगर नियोजन समिती अधिनियम, १९९९ च्या कलम २ च्या खंड (क) अन्वये महानगर क्षेत्र म्हणून घोषित केलेल्या विवक्षित क्षेत्रांच्या उचित, सुव्यवस्थित व शीघ्र विकासाचे समन्वयन व पर्यवेक्षण

करण्याच्या आणि अशा विकासाच्या योजना, प्रकल्प व परियोजना यांची अंमलबजावणी करण्याच्या प्रयोजनार्थ, अशा प्रदेशातील क्षेत्राकरिता प्राधिकरणे स्थापन करण्यासाठी आणि त्यांच्याशी संबंधित किंवा तदनुषगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अध्यादेश, २०१६, दि.१३ जून २०१६ रोजी प्रख्यापित केला आहे.

सदर अध्यादेशाच्या कलम ३ चे उपकलम (१) नुसार प्राधिकरण स्थापन होईपर्यंत उक्त विकास क्षेत्रासाठी स्थापन केलेले उक्त विकास प्राधिकरणास उक्त अध्यादेशाच्या कलम ४ चे उप कलम (३) मध्ये त्यांची कार्ये व कर्तव्ये पुढे चालू ठेवण्याची तरतूद आहे.

महाराष्ट्र शासन महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अध्यादेश, २०१६ चे कलम ३ चे उप कलम (१) आणि उक्त महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमाच्या कलम ४२ क, ४२ ग व ४२ च अन्वये या संदर्भात प्रदान केलेल्या शक्तीचा वापर करून या अधिसूचनेद्वारे-

(क)पुणे महानगर प्रदेशासाठी, विशेष करून सदर अधिसूचनेसोबत जोडलेल्या अनुसूचित नमूद केलेल्या क्षेत्राकरिता, मा.भारताचे राष्ट्रपती महोदयांनी वेळोवेळी घोषित केलेले अनुसूचित क्षेत्र वगळून पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची स्थापना केली आहे.

(ख)ज्या अधिसुचनेद्वारे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमाच्या कलम ४२ क खाली पुणे महानगर क्षेत्रास, पुणे महानगर विकास क्षेत्र म्हणून घोषित करून कलम ४२ ग नुसार या घोषित क्षेत्रासाठी पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण गठित केले आहे. तो दि.३१ मार्च २०१५ ची अधिसूंचना क्र. टीपीएस.१८१५/१२०४/१३/प्र.क्र.८७/१५/नवि-१३ आणिज्या अधिसूचनेद्वारे इतर बाबींसह पुणे महानगर विकास क्षेत्राची हद्दवाढ घोषित केली आहे. ती दि. ४ डिसेंबर २०१५ ची अधिसूचना क्र.टीपीएस.१८१५/६१३/प्र.क्र.३०९/नवि-१३ आणि दि.१० फेब्रुवारी २०१६ ची अधिसूचना क्र.टीपीएस.१८१५/६१३/प्र.क्र.३१३/१५/नवि-१३ विखंडीत केली आहे.

## प्राधिकरणाचे ध्येय :

१)पुणे महानगर प्रदेशाचा सुनियंत्रित विकास साधण्याकरिता नियोजन प्राधिकरण म्हणून सर्व कार्य व कर्तव्ये पार पाडणे.

२)पुणे महानगराचा सर्वांगीण विकास होण्याकरिता नियोजनबध्द विकास योजना तयार करणे, नगररचना योजना राबविणे, विकास क्षेत्रात सर्वेक्षण करणे, सर्व प्रकारच्या सोयी सुविधाबाबत नियोजन करणे.

३)महानगर परिक्षेत्रात सुनियंत्रित विकास साधणे.

## प्राधिकरणाचे कार्यक्षेत्र

| | |
|---|---|
| पुणे महानगर विकास क्षेत्र हे खाली नमूद चतु:सीमांमध्ये असलेल्या पुणे जिल्यातील मावळ व पुणे शहर तालुक्यांचे पुर्णक्षेत्र तसेच हवेली, भोर, दौंड, शिरूर, मुळशी आणि खेड तालुक्यातील काही भाग मिळून होईल. | |
| पूर्व | शिरूर तालुक्यातील तरडोबाचीवाडी, गोळेगाव, चव्हाणवाडी निमोणे, न्हावरा, खोकडेवाडी, आंदळगाव, नागरगाव गावांची पूर्व हद्द ते दौंड तालुक्यातील गणेशरोड, नानगाव,वरवंड या गावांच्या पूर्व हद्दीपर्यंत. |
| पश्चिम | मुळशी तालुक्यातील धामण ओहोळ, ताम्हिणी बुद्रुक, निवे, पिंपरी, घुटके, एकोले, तैलबैला, सालतर, माजगाव, आंबवणे, पेठ शहापुर, देवघर या गावांची पश्चिम हद्द, मावळ तालुक्यातील आटवण, डोंगरगाव, कुणेनामा, उधेवाडी, जांभवली, कुसूर, खांड, सावले या गावांची पश्चिम हद्द. |
| उत्तर | मावळ तालुक्यातील मालेगाव बुद्रुक, पिंपरी, माळेगाव खुर्द, कुणे, अनसुटे, इंगळून, किवळे, कशाळ, तलाट या गावांची उत्तर हद्द, खेड तालुक्यातील वाह्गाव, तोरणे बुद्रुक, हेतरुज, कोहिंदे बुद्रुक, गारगोटवाडी, कडूस या गावांची उत्तर हद्द, चास गावाची पश्चिम हद्द ते कमान, मिरजेवाडी गावाची उत्तर हद्द, काळेचीवाडी, अरुदेवाडी, सांडभोरवाडी, गुळाणी, चिंचबायवाडी, जऊळके बुद्रुक, वाफेगाव, गडकवाडी, या गावांची उत्तर हद्द, शिरूर तालुक्यातील थापेवाडी, माळवाडी, खैरेनागद, कान्हूर मेसाई, मिडगुळवाडी, मलठण, अमदाबाद, आण्णापूर, शिरूर या गावांची उत्तर हद्द. |

| | |
|---|---|
| दक्षिण | दौंड तालुक्यातील बोरी पारधी, वाखरी, भांडगाव, यवत, भरतगाव, ताम्हणवाडी, डाळींब या गावांची दक्षिण हद्द, हवेली तालुक्यातील शिंदवणे गावाची दक्षिण हद्द, पुरंदर तालुक्यातील गु-होळीची पूर्व हद्द, सिंगापूर गावाची पूर्व व दक्षिण हद्द, उदाचीवाडी, कुंभारवळण गावांची दक्षिण हद्द ते पिंपळे गावची पूर्व हद्द, बो-हलेवाडी या गावांची पूर्व हद्द, पाणवडी गावची पूर्व - दक्षिण हद्द, घेरा पुरंदर, भैरववाडी, मिसाळवाडी या गावांची दक्षिण हद्द, कुंभोशी गावची पूर्व व दक्षिण हद्द, भोर तालुक्यातील मोरवाडी, वाघजवाडी, भोंगवली, पांजळवाडी, टपरेवाडी, गुणंद या गावांची पूर्व हद्द, गुणंद,वाठारहिंगे, न्हावी, राजापूर, पांडे, सारोळे,केंजळ, धांगवडी,निगडे,कापूरव्होळ, हरीश्चंद्री, उंबरे, सांगवी खुर्द, निधान, दिडघर, विरवडे, जांभळी, सांगवी बुद्रुक या गावांची दक्षिण हद्द, वेल्हे तालुक्यातील आंबवणे, करंजावणे, अडवली, मार्गासणी, आस्कावाडी, विंजर, मळवली, लासिरगाव, दापोडे या गावांची दक्षिण हद्द, वेल्हे तालुक्यातील दापोडे गावाची पश्चिम हद्द ते खामगाव गावची दक्षिण हद्द ते रुळे, कडवे, वडघर, आंबेगाव बुद्रुक, दिवशी, शिरकोळी, थानगाव, पोळे, माणगाव या गावांची दक्षिण हद्द, माणगाव आणि कशेडी या गावांची पश्चिम हद्द, मुळशी तालुक्यातील ताव व गडले गावची दक्षिण हद्दीपर्यंत. |

- **निर्णयाबाबतची कार्यपद्धती :**

प्राधिकरणातील विविध विभागांचे कामकाज चालविण्यासाठी प्रकरण महानगर प्रादेशिक आणि नगर रचना अधिनियम १९६६ व महाराष्ट्र महनगर प्रदेश विकास प्राधिकरण अध्यादेश २०१६ या अधिनियमांना अधीन राहून अंतिम निर्णय प्राधिकरण सभेमध्ये घेतले जातात.

नियमावलीतील कार्यपध्दतीनुसार व प्राधिकरण सभेने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयानुसार निर्णय प्रक्रिया होत असते. काही बाबतीत प्राधिकरण दैनंदिन कामकाजाच्या बाबतीत आपल्या दुय्यम अधिकाऱ्यांना शक्ती प्रदान करू शकतात. प्राधिकरणाचे अध्यक्ष हे प्राधिकरणाच्या वतीने सर्व कामकाजाचे निरीक्षण व नियंत्रण करतील आणि या अध्यादेशान्वये बहाल केलेल्या शक्तींचा वापर करून प्राधिकरण वेळोवेळी निश्चित करेल अशी सर्व कर्तव्ये पार पडतील. परंतु, अध्यक्ष हे सहअध्यक्षांना आपल्या शक्ती व कर्तव्ये पार पाडण्यासाठी नियुक्त करू शकतील.

महानगर आयुक्त हे प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी असतील आणि अशा शक्तींचा वापर करून प्राधिकरण ठरावाद्वारे निश्चित केलेली कार्ये व कर्तव्ये पार पाडतील. महानगर आयुक्त हे सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे प्राप्त शक्ती, कार्ये व कर्तव्ये कलम ७ च्या उपकलम ५ अन्वये उक्त आदेशामध्ये उल्लेख केल्यानुसार दुय्यम अधिकाऱ्यांकडे बहाल करू शकतील.

## प्राधिकरणाचे कार्यालयातील दस्तऐवजांची माहिती :

पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरणाकडे खालील प्रकारची कागदपत्रे असतात.

अ. मुळ योजनेचा शासनमान्य नकाशा.

इ. प्राधिकरण सभेचे इतिवृत्तांत.

उ. सदर भूखंडावर केलेल्या बांधकामाबाबतचे नकाशे, बांधकाम परवाने, पूर्णत्वाचे दाखले इ.

ऊ विविध विभागाकडील महत्वाच्या विषयासंबधी जतन करावयाच्या नस्त्या, नोंदवह्या, विकास परवानगी विभागाकडील निर्णय पूर्ण झालेल्या नस्त्या इ.

## प्राधिकरणाची धोरणे/निर्णय ठरवण्यासाठी जनसामान्यांशी सल्ला मसलतीबाबत तरतूद :

पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरणास लागू असलेल्या महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर रचना अधिनियम १९६६ च्या तरतुदीप्रमाणे प्राधिकरण विकास योजना तयार करून अथवा त्यातील बदलाबाबत कायदेशीर तरतुदीनुसार जाहिरात प्रसिद्ध करते. अशा जाहिरातीस सुनावणी देण्यात येते आणि नंतरच विकास योजनेतील विविध प्रयोजनांची आरक्षणे अथवा बदल शासनाच्या मान्यतेने कायम केले जातात. इतर प्रशासकीय कामेही शासन मान्य, बांधकाम नियमावली तसेच शासन निर्णयानुसार चालतात. प्राधिकरण समितीवर लोक प्रतिनिधीत्व अथवा सल्लामसलतीची नियुक्तीची तरतूद वैधानिकरित्या अधिनियमातच केली आहे.

## जनसामान्यांकडून सूचना :

नागरिकांची सनद सर्वसामान्य नागरिकांच्या छाननीसाठी नेहमीच खुली असते व सन्माननीय नागरिकांच्या बहुमूल्य सूचनांचा गांभीर्यपूर्वक विचार करून त्यात वेळोवेळी सुधारणा घडवून आणता येतील. प्राधिकरणाच्या अधिनस्त येणाऱ्या सेवा उपभोगणाऱ्यां नागरिकांना आपले हक्क मांडण्यासाठी सनद नेहमीच सहकार्य करेल.

# पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विक



# पाधिकरणाची हद्द दर्शविणारा नकाशा



## नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी :

प्राधिकरण नागरिकांच्या या सनदेची अंमलबजावणी करण्यास कटिबद्ध आहे. प्राधिकरण आपल्या अधिपत्याखालील सेवा कर्तव्यभावनेने व कार्यतत्परतेने उपलब्ध करुन देण्याची हमी देत आहे. या सेवा पुरविताना नागरिकांना सौजन्यपूर्ण वागणूक देण्याची जबाबदारी प्राधिकरणातील प्रत्येक अधिकारी/कर्मचाऱ्यांची राहील.

## प्राधिकरणामार्फत सुरु असलेली ठळक कामे-

१.हिंजवडी ते शिवाजीनगर पुणे मेट्रो प्रकल्प

२.पुणे प्रादेशिक योजनेत समाविष्ट रिंग रोड प्रकल्प

३.येरवडा येथील नविन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करणे.

४.प्राधिकरण क्षेत्रातील रस्ते विकास कार्यक्रमाचे नियोजन व वाहतुक कोंडीवरील उपाययोजना करणे.

५.प्राधिकरण क्षेत्रामध्ये उपलब्ध पाण्याचे नियोजन करणे.

६.प्राधिकरण क्षेत्रातील इंद्रायणी नदी सुधार प्रकल्प.

७.पुणे ते लोणावळा व पुणे ते दौंड दरम्यान उपनगरीय रेल्वे मार्ग.

८.पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामध्ये खाजगी सहभागातून रस्ते पुल उड्डाणपुलाची कामे.

अ) केशवनगर खराडी दरम्यान मुळा मुठा नदीवर मोठा पुल बांधणे

ब) मुंढवा केशवनगर येथील ग्रामपंचायत हद्दीत पुलाचे रुंदीकरण करणे.

क) खाजगी सहभागातून प्रादेशिक योजनेतील रस्त्यांची सुधारणा करणे.

ड) म्हाळुंगे येथील सर्व्हे नं. ४,५,६,७,व ६०/१ मधून जाणाऱ्यां प्रादेशिक योजनेतील रस्त्याचे बांधकाम करणे.

९. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामध्ये खाजगी सहभागातून पिरंगुट व्हॅली,सुस-म्हाळुंगे डेव्हलपमेंट फोरम,हिंजवडी - माण डेव्हलपमेंट फोरम यांचेकडून पाणीपुरवठा योजना राबविणे

१०. गिर्यारोहण/पर्यावरणास प्रोत्साहन देणेबाबत उपाययोजना करणे.

११.प्राधिकरण क्षेत्रात शेती व शेतीपुरक फुलशेती या व्यवसाय वृद्धीसाठी व त्यायोगे रोजगार निर्मितीसाठी प्रयत्न करणे.

१२.सिटी कॉर्पोरेशन लि. यांचा ॲमनओरा टाऊनशिपमधील मांजरी गावाला जोडणारा रस्ता व Railway Under Bridge (RUB) बांधणे.

# विकास परवानगी विभाग

| अ.क्र. | सेवांचा तपशील | सेवा पुरविणारे अधिकारी/ कर्मचारी यांचा हुद्दा | सेवा पुरविण्याची विहित मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या अधिकाऱ्याचे पदनाम |
|---|---|---|---|---|
| १ | झोन दाखला देणे<br>१) विहित नमुन्यातील अर्ज<br>२) ७/१२ उतारा/सिटी सर्व्हे उतारा<br>३) मोजणी नकाशा/सिटी सर्व्हे नकाशा | सहाय्यक नगररचनाकार | ७ दिवस | नगररचनाकार |
| २ | भाग नकाशा देणे<br>१) विहित नमुन्यातील अर्ज<br>२) ७/१२ उतारा/सिटी सर्व्हे उतारा<br>३) मोजणी नकाशा/सिटी सर्व्हे नकाशा | सहाय्यक नगररचनाकार | ३ दिवस | नगररचनाकार |
| ३ | बांधकाम परवाना देणे<br>१)विहित नमुन्यातील अर्ज<br>२)वास्तुविशारदाचा दाखला<br>३)मालकी हक्काची कागदपत्रे<br>४) बांधकाम आराखडा नकाशा ५ प्रती<br>५) मोजणी नकाशा<br>६) मंजूर रेखांकनाची प्रत | सहाय्यक नगररचनाकार, नगररचनाकार | ६० दिवस | महानगर नियोजनकार |
| ४ | जोते प्रमाणपत्र<br>१)विहित नमुन्यातील अर्ज<br>२)वास्तुविशारदाचा दाखला<br>३)मालकी हक्काची कागदपत्रे<br>४) बांधकाम आराखडा नकाशा ५ प्रती<br>५) मोजणी नकाशा<br>६) मंजूर रेखांकनाची प्रत | सहाय्यक नगररचनाकार, नगररचनाकार | १५ दिवस | महानगर नियोजनकार |
| ५ | भोगवटा प्रमाणपत्र देणे<br>१) विहित नमुन्यातील अर्ज<br>२) बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र<br>३) घर मालक/वास्तुविशारद यांचे पुर्णत्वाचे स्वयंघोषणापत्र | सहाय्यक नगररचनाकार, नगररचनाकार | ३० दिवस | महानगर नियोजनकार |

## अग्निशमन विभाग

| अ.क्र. | सेवांचा तपशील | सेवा पुरविणारे अधिकारी/ कर्मचारी यांचा हुद्दा | सेवा पुरविण्याची विहित मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या अधिकाऱ्याचे पदनाम |
|---|---|---|---|---|
| १ | माहिती अधिकारांतर्गत माहितीकरिता प्राप्त होणारे अर्ज/अपिल इ. | संबंधित जनमाहिती अधिकारी/ अपिलीय अधिकारी | माहिती अधिकारांतर्गत विहित केलेला कालावधी | मुख्य अग्निशमन अधिकारी |
| २ | प्राथमिक ना-हरकत प्रमाणपत्र | उप-अग्निशमन अधिकारी | ७ दिवस (अग्निशमन सेवा शुल्क जमा केलेल्या दिनांकापासून) | मुख्य अग्निशमन अधिकारी |
| ३ | अंतिम ना-हरकत प्रमाणपत्र | उप-अग्निशमन अधिकारी | १५ दिवस (सर्व आक्षेपाची पुर्तता केल्यानंतर) | मुख्य अग्निशमन अधिकारी |

## अभियांत्रिकी विभाग

| अ.क्र. | सेवांचा तपशील | सेवा पुरविणारे अधिकारी/ कर्मचारी यांचा हुद्दा | सेवा पुरविण्याची विहित मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या अधिकाऱ्याचे पदनाम |
|---|---|---|---|---|
| १ | पायाभूत सुविधा जसे की रस्ते बांधणे, पुलाचे बांधकाम, उड्डाणपुलाचे काम, पाणीपुरवठा योजना इ. चे खाजगी संस्था किंवा बांधकाम व्यावसायिकांकडून प्राप्त प्रस्तावास प्राधिकरणाच्या धोरणानुसार मंजुरी देणे. | मुख्य अभियंता | १५ दिवसांच्या आत | महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी |
| २ | ऑप्टीक फायबर केबल, पाण्याची पाईपलाईन, गॅस पाईपलाईन इ. टाकण्यासाठी, प्राधिकरणाच्या रस्त्यावरील क्रॉसिंग करण्यासाठी, खाजगी संस्थेस/कंपनीस मंजुरी देणे. | मुख्य अभियंता | १५ दिवसांच्या आत | महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी |

| जमिन व मालमत्ता विभाग | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | सेवांचा तपशील | सेवा पुरविणारे अधिकारी/ कर्मचारी यांचा हुद्दा | सेवा पुरविण्याची विहित मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या अधिकाऱ्याचे पदनाम |
| १ | रस्ते, सुविधा क्षेत्रांचे हस्तांतरण करणेकामी ताबा घेणे | उपअभियंता | परिपूर्ण प्रकरण प्राप्त झाल्यानंतर १ आठवडा | उपनियंत्रक अनधिकृत बांधकाम, विशेष कार्य अधिकारी |
| २ | हस्तांतरण दस्त नोंदणी | विशेष कार्य अधिकारी | ताबा प्रक्रीयेनंतर १ आठवडा | मा.महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी |
| ३ | हस्तांतरण प्रक्रिया पूर्ण झालेली प्रकरणे FSI साठी विकास परवानगी विभागाकडे पाठविणे | विशेष कार्य अधिकारी | ७/१२ व फेर फार प्राप्त झाल्यानंतर ३ दिवस | मा.महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी |

| अनधिकृत बांधकाम विभाग | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | सेवांचा तपशील | सेवा पुरविणारे अधिकारी/ कर्मचारी यांचा हुद्दा | सेवा पुरविण्याची विहित मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या अधिकाऱ्याचे पदनाम |
| १ | अनधिकृत बांधकाम विषयक तक्रारीची स्थळपाहणी व प्राथमिक चौकशी | उपअभियंता सहाय्यक अभियंता | २ आठवडे | तहसिलदार तथा सहाय्यक नियंत्रक अनधिकृत बांधकाम/ उपनियंत्रक अनधिकृत बांधकाम विभाग |
| २ | अनधिकृत बांधकाम प्रकरणी नोटीस बजावणे. | उपअभियंता | २ आठवडे | तहसिलदार तथा सहाय्यक नियंत्रक अनधिकृत बांधकाम/ उपनियंत्रक अनधिकृत बांधकाम विभाग |
| ३ | अनधिकृत बांधकाम प्रकरणी कारवाई | उपअभियंता | नोटीस कालावधी संपल्यानंतर २ आठवडे | तहसिलदार तथा सहाय्यक नियंत्रक अनधिकृत बांधकाम/ उपनियंत्रक अनधिकृत बांधकाम विभाग |

| प्रशासन व आस्थापना विभाग | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र | सेवांचा तपशील | सेवा पुरविणारे अधिकारी/ कर्मचारी यांचा हुद्दा | सेवा पुरविण्याची विहित मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या अधिकाऱ्याचे पदनाम |
| १ | प्राधिकरणांतर्गत अधिकारी/कर्मचारी यांची नियुक्ती संदर्भातील निवेदने/प्रकरणे | वरिष्ठ लिपिक | ९० दिवस | उपमुख्य कार्यकारी अधिकारी |
| २ | नोकरी मिळणेकरिता प्राप्त होणारे अर्ज, तक्रार अर्ज, इतर अर्ज इ. | वरिष्ठ लिपिक | ३० दिवस | उपमुख्य कार्यकारी अधिकारी |
| ३ | माहिती अधिकारांतर्गत माहितीकरिता प्राप्त होणारे अर्ज/अपिल इ. | संबंधित जनमाहिती अधिकारी | माहिती अधिकारांतर्गत विहित केलेला कालावधी | संबंधित अपिलीय अधिकारी |
| ४ | शासकीय, निमशासकीय व सामान्य जनता तसेच टपाल खाते यांच्याकडून आलेल्या आवक टपालाची नोंद घेऊन विषयानुरूप सर्व टपाल प्राधिकरणातील संबंधित विभागांकडे पुढील योग्य त्या कार्यावाहीस्तव अग्रेषित करणे. | लिपिक आवक शाखा | १ दिवस तात्काळ | उपमुख्य कार्यकारी अधिकारी |

# पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कार्यालय
# नागरिकांची सनद

**PUNE**METROPOLIS

(PUNE METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY)

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

PUNE METROPOLIS

# पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

महाराजा सयाजीराव गायकवाड उद्योग भवन,
तिसरा व चौथा मजला,
स.क्र.152 + 153, औंध, पुणे 411067
फोन नं. : 020-259 33 344 /356 /333
Email: comm@pmrda.gov.in Website : pmrda.gov.in

pmrda pune @pmrda_pune